बुधवार, दि २६ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक २६ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक महिला व पुरुष शिक्षकाचा आत्मदहनाचा प्रयत्न!

### पोलिसांच्या मध्यस्थीने अनर्थ टळला; अंशतः अनुदानित शिक्षकांसाठी निधीची तरतूद करून तातडीने निधी वितरित करण्याची मागणी

**जालना | प्रतिनिधी -** अंगावर ज्वलनशील पदार्थ ओतून घेत महिला आणि पुरुष शिक्षकाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहनाचा प्रयत्न केलाय. जालन्यात आज अंशतः अनुदानित शिक्षकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर आपल्या विविध मागण्यांसाठी मोर्चा काढला होता. यावेळी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिल्यानंतर एका महिला शिक्षिकेसह पुरुष शिक्षकाने अंगावर ज्वलनशील पदार्थ ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न केलाय. मात्र पोलिसांच्या उपस्थितीमुळे यावेळी मोठ्या अनर्थ टळला असून पोलिसांनी एका महिला शिक्षिकेसह चार ते पाच पुरुष शिक्षकांना ताब्यात घेतलय.

अंशतः अनुदानित शिक्षकांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात वर धडक मोर्चा च्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. यावेळी खबरदारी म्हणून अग्निशमन दलाचा एक बंब ही जिल्हाधिकारी कार्यालय बाहेर तयार ठेवण्यात आला होता.

विना अनुदानित शिक्षकांना २० टक्के अनुदानाचा पुढील वाढीव टप्पा देण्यात यावा असा १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णय निर्गमित केला होता. मात्र देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारनं या अर्थसंकल्पात यासाठी कुठलिच तरतूद केलेली नाहीये. यासाठी विना अनुदानित शिक्षकांच्या वतीनं आंदोलनं केली गेली. मात्र अद्याप यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला नाही.

दिलदार नेता म्हणून ऊपमुख्यमंत्री आजित पवार यांच्यी महाराष्ट्रात ख्याती आहे, हाकेला धावून जाणारा नेता म्हणून आपली ओळख आहे परंतू ६३ हजार शिक्षकांच्या मागण्यांना आपण का गांभीर्याने घेत नाही हा प्रश्न समस्त पान ३ वर



## युवा आदर्श
### मातृत्व ...

कॅमेऱ्यासमोर भावना
ओसंडून वाहे मातृत्व
मदत देताना प्रसिद्धी
सिध्द करायचे बंधुत्व
नाटकीपणा रंध्रा रंध्रा
कमी ना होई वगतृत्व
भित्रेपणाकृती उक्तीत
उसळी मारते रे पुंस्त्व
बारीक सारीक निर्णय
जाणावे आपले बहुत्व
पाण उतारा इतरा बरा
इतर पारड्यात लघुत्व
लपवून ठेवावे खंजीर
पेहरावा दिसे साधुत्व
व्याख्याने झोडा खास
वाणीत अत्यंत मधुत्व
चष्मे घालावे आकर्षक
दिसू नये जगा अंधत्व
किती झाकालं दुर्गुण
नसा नसा भरे दभित्व
लायकी नसे मुळी जरी
हवेचं सत्तेचे स्वामित्व
येन केन प्रकारेण भले
कायम सत्तेचे अस्तित्व

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# आदिवासी आश्रम शाळांच्या धर्तीवर व्हीजेएनटी आश्रम शाळांना नैसर्गिक वाढ व अनुदान द्या - आमदार लोणीकर

**मुंबई -** १९९५ च्या महायुती सरकार मध्ये व्हीजेएनटी आश्रम शाळांना मान्यता देण्यात आली होती. त्यावेळी मान्यता देण्यात आलेल्या व्हीजेएनटी आश्रम शाळा केवळ १ ली ते ७ वी पर्यंत मान्यता देण्यात आली होती. परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थी या आश्रम शाळांमध्ये सातवीपर्यंत शिक्षण घेतात आणि ७ वीनंतर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. या सर्व आश्रम शाळांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी गोरगरीब कष्टकरी कामगार यांच्यासह ऊसतोड कामगारांचे मुलं आहेत परिणामी ७ वीपर्यंत या आश्रम शाळांमध्ये शिक्षण घेऊन हे विद्यार्थी पुन्हा ऊस तोडीसाठी किंवा आपला पारंपारिक व्यवसाय करण्यासाठी प्रवृत्त होतात त्यामुळे या विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण होत नाही म्हणून व्हीजेएनटी च्या या सर्व आश्रम शाळांना इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत चे वर्ग नैसर्गिक वाढीने मंजूर करून त्यांना अनुदान देण्यात यावे अशी मागणी आज विधानसभेत माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी तारांकित प्रश्नाद्वारे केली.

आज विधिमंडळातील तारांकित प्रश्न क्रमांक ६५५५ द्वारे आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्रातील इयत्ता आठवी ते दहावी नैसर्गिक वाढीने वर्ग व त्याचे अनुदान मंजूर करण्याचा विषय सभागृहात उपस्थित केला यासंदर्भात पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, राज्यातील एकूण ९७७ व्हीजेएनटी आश्रमशाळा चालू आहेत त्यापैकी अधिकांश शाळा या फक्त प्राथमिक (वर्ग १ ते ७ वी ) आहेत, अशा सर्व प्राथमिक शाळांना नैसर्गिक वर्ग वाढीने वर्ग ८ ते १० पर्यंत वर्ग वाढ देण्यात यावी अशी मागणी वारंवार



केलेली आहे. परंतु अधिकारी स्तरावर या संदर्भात कुठलीही कार्यवाही होत नाही मागील पाच वर्षापासून आपण या सदर्भाने सातत्याने

प्रश्न उपस्थित केले असून तसेच सातत्याने पाठपुरावा देखील केलेला आहे परंतु बेजबाबदार व कामचकार अधिकाऱ्यांमुळे हा प्रश्न मार्गी लागू शकला नाही असेही आमदार लोणीकर विधानसभेत म्हणाले.

सततच्या गरिबीमुळे पोट भरण्यासाठी उस तोड व इतर कामांसाठी भटकंती करण्याच्या हटकर, धनगर, बंजारा, बंजारी, गाडी लोहार, जोगी, नाथयोगी, घीसडी इत्यादी व्हीजेएनटी प्रवर्गाच्या कुटुंबातील मुलांना पुढील शिक्षणात मोठी अडचण निर्माण होते, नाईलाजाने ही सर्व मुले सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून पुन्हा एकदा आपला पान ३ वर

जालना ते जळगांव रेल्वे;

# अजिंठा लेणी जोडणी भुसंपादनाच्या अनुषंगाने रावसाहेब दानवे यांची जिल्हाधिकारी व रेल्वे अधिकाऱ्यांसोबत चर्चा



**जालना | प्रतिनिधी -** रेल्वे बोर्डाने जालना ते जळगांव पर्यंत अजिंठा लेणी रेल्वे कनेक्टेव्हीटी ( १७४ कि.मी.) प्रकल्पास मंजूरी दिली आहे. त्या अनुषंगाने गावनिहाय भुसंपादन अधिकारी यांचे नांमकन जिल्हाधिकारी कार्यालय,जालना यांना प्राप्त झाले असून त्यासाठी भुसंपादन सक्षम प्राधिकारी (CL) म्हणून घोषीत करण्यात आले आहे. जालना ते जळगांव रेल्वे पान २ वर

# जालना शहरातील लाभार्थ्यांना आवाहन

**जालना | प्रतिनिधी -** जालना शहरातील संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवानिवृत्ती वेतन योजना या लाभार्थ्यांना डी.बी.टी.मार्फत त्यांच्या खात्यावर पैसे डिसेंबर-२०२४ पासुन जमा करण्यात येत आहेत. त्यासाठी लाभार्थ्यांना बँक खात्याशी आधार क्रमांक आणि मोबाईल क्रमांक लिंक करणे आवश्यक आहे. तरी संबंधित लाभार्थ्यांनी मोबाईल क्रमांक व आधार क्रमांक बँक खात्याला लिंक केल्याची पावती, ई-केवायसी पावती, वर्गवारी पुराव्याची छायांकित प्रत जालना तहसील कार्यालयात दि.३१ मार्च २०२५ पर्यंत जमा करावी. कागदपत्राची पुर्तता न केल्यास लाभार्थी अनुदानापासुन वंचित राहिल्यास त्यास लाभार्थी स्वतः जबाबदार राहील, असे जालना तहसीलदार छाया पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# संपादकीय

## भारत आनंदी का नाही?

२० मार्च हा दिवस जागतिक आनंद दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून संयुक्त राष्ट्र संघाच्या सस्टेनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन नेटवर्कद्वारे दरवर्षी एक सर्व्हे केला जातो. संपत्ती, आरोग्या बरोबरच परस्परंवरील विश्वास, ऋणानुबंध, करुणा या निकषांच्या आधारावर हे सर्व्हेक्षण केले जाते. वरील निकषांचा विचार करून यावर्षीही या संस्थेने जगातील १४७ देशांचा सर्व्हे करून एक अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालात या संस्थेने जगातील सर्वाधिक आनंदी देशांची यादी प्रसिद्ध केली. या यादीतील पहिल्या वीस देशांमध्ये युरोपातील देशांचे वर्चस्व आहे. गेल्या अनेक वर्षापासून युद्धाच्या आगीत होरपळणारा इस्राईल हा देश आनंदी देशांच्या यादीत आठव्या स्थानी आहे. सतत युद्धाच्या छायेत राहूनही इस्रायली नागरिक आनंदी आहेत. या अहवालानुसार जगातील सर्वात आनंदी देश म्हणून फिनलँड या देशाची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे फिनलँड हा देश सलग आठव्यांदा जगातील सर्वात आनंदी देश ठरला आहे. भारत मात्र या देशांच्या यादीत खूप खालच्या क्रमांकावर आहे. १४७ देशांच्या यादीत भारत ११८ व्या क्रमांकावर आहे. विशेष म्हणजे पाकिस्तान, नेपाळ, आणि चीन हे भारताच्या शेजारी देश भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत असा हा अहवाल सांगतो. पाकिस्तान, नेपाळ आणि चीन यासारख्या देशात सध्या मोठया प्रमाणात अराजकता माजली असताना देखील ते देश आनंदी आहेत इतकेच काय तर युद्धग्रस्त युक्रेन आणि पॅलेस्टाईन हे देशही भारतापेक्षा अधिक आनंदी आहेत. आनंदी देशांच्या यादीत युक्रेन १११ व्या क्रमांकावर आहे तर पॅलेस्टाईन १०८ व्या क्रमांकावर आहे. जगातील गरीब, मागास आणि युद्धाच्या छायेत असणाऱ्या देशातील लोक आनंदी असताना भारतासारख्या खंडप्राय देशातील लोक आनंदाबाबतीत तळाच्या स्थानी असणे ही चिंतेची बाब आहे. भारतातील नागरिक आनंदी का राहू शकत नाहीत, याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. फिनलँडने सलग आठव्यांदा आनंदी देशाच्या यादीत अव्वल क्रमांक मिळवला याला कारणही तसेच आहे. येथे अनेक गोष्टी निर्विवादपणे चांगल्या आहेत. सुंदर निसर्ग, विस्तीर्ण जंगले आणि तलावांचा देश. हा देश सर्वव्यापी सार्वजनिक सेवांसाठी देखील ओळखला जातो. आम्ही सुस्थितीत आहोत, देशाच्या बऱ्याच गोष्टी व्यवस्थित आहेत असा तेथील लोकांना विश्वास आहे. अधिकारावरील व्यापक विश्वास, गुन्हेगारीचा निम्नस्तर आणि समानता असे मत तेथील लोकांनी व्यक्त केले. आनंदाच्या अहवालातील एक महत्वाचे मोजमाप म्हणजे लोकांना किती सुरक्षित वाटते. फिनलँडने काही वर्षांपूर्वी आपल्या शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल केला आहे. फिनलँड मधील शिक्षण प्रणाली ही जगातील सर्वोत्तम शिक्षण प्रणाली मानली जाते. फिनलँड देशात बेरोजगारीचा दर सर्वात कमी आहे. शिवाय तेथील आरोग्य प्रणाली देखील सर्वोत्तम आहे. त्यामुळे तेथील लोक सर्वाधिक आनंदी आहेत. फिनलँड देशाला इतर देशांपेक्षा वेगळे बनवणारा आणखी एक घटक म्हणजे समानता. जी प्रत्येकासाठी संधी निर्माण करते. मग ते कोणत्याही सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमिचे असले तरीही. फिनलँडमध्ये मध्यमवर्ग जास्त आहे आणि गरिबी कमी आहे. भारतातही फिनलँड सारखी व्यवस्था निर्माण झाली तर भारतीय लोकही आनंदी राहतील. मात्र येथील व्यवस्था बदलण्याची इच्छाशक्ती कोणाकडे नाही म्हणूनच भारत आनंदी देशाच्या यादीत तळाच्या स्थानी आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या विद्यार्थ्यांना आवाहन

**जालना -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी अर्ज सादर केला आहे. परंतू ज्या विद्यार्थ्याना सेंट बँक ऑप्शन आले आहे, अशा विद्यार्थ्यांनी त्रुटीचे कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावयाचे आहेत. तसेच विद्यार्थ्यांनी बँक तपशिल भरण्याबाबतचा टॅब त्यांच्या लॉगिनला उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने सर्व विद्यार्थ्यांनी बँक तपशील भरुन घेण्याची व त्रुटीची पुर्तता तात्काळ करावी, असे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सदर योजनेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळावर दि. १५ मार्च, २०२५ पर्यंत स्विकारण्यात आलेले होते.

### आज पासून ग्रंथोत्सव!

# डॉ .बाबासाहेब आंबेडकर सभागृहात साहित्यिक मेळावा, सांस्कृतिक उपक्रमांची मेजवानी

**जालना । प्रतिनिधी -** ग्रंथालय संचालनालय आणि जालना जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण अंतर्गत टाऊन हॉल स्थित डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात दि. २६ व २७ मार्च या कालावधीत जालना ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून दोन दिवस साहित्यिक, सांस्कृतिक उपक्रम होणार आहेत अशी माहिती जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे यांनी दिली.

बुधवारी ( ता. २६) सकाळी ०९.३० वा. गांधी चमन येथे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन होईल.अध्यक्षस्थानी कवी डॉ. ललित अधाने हे राहतील. यावेळी जि. प .चे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तुकाराम भिसे, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सूर्यवंशी, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, मनपाचे मुख्य लेखापरीक्षक प्रवीण निंबाळकर, जिल्हा माहिती अधिकारी अरुण सूर्यवंशी, यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

सकाळी ११.०० वा. पालकमंत्री पंकजाताई मुंडे, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खासदार डॉ. कल्याण काळे, खा. संजय जाधव, आ. सतीश चव्हाण ,आ.विक्रम काळे, आ. राजेश राठोड , आ. अर्जुनराव खोतकर ,आ.बबनराव लोणीकर, आ. नारायण कुचे ,आ.संतोष दानवे, आ. हिकमत उढाण, जि.प.चे मु.का.अ.जगदीश मिनियार ,जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, मनपा आयुक्त संतोष खांडेकर , ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर,सहायक संचालक सुनील हुसे, कवयित्री डॉ.संजीवनी तडेगावकर, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राजेश राऊत , जिल्हा ग्रंथालय असोसिएशनचे अध्यक्ष डि. बी. देशपांडे, यांच्या उपस्थितीत ग्रंथोत्सवाचे उद्घाटन होईल. प्रा. रंगनाथ खेडेकर हे सूत्रसंचालन करतील.दुपारी ०२.०० वा.डॉ.उद्धव थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा अभिजात दर्जा या विषयावरील परिसंवादात डॉ. समाधान इंगळे, प्रा. मधुकर जोशी, डॉ. कि. वा. वाघ, राजेश ओ. राऊत, यांचा सहभाग राहणार आहे. राजीव हजारे हे सुत्रसंचालन करतील. दुपारी ०३.३० वा. राम गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवी संमेलन होणार असून यात शिवाजी कायंदे, डॉ.सुहास सदाव्रते, अच्युत मोरे, रमाकांत कुलकर्णी , साहिल पाटील, कैलास भाले, विनोद काळे, श्रीकांत गायकवाड, श्रीमंत ढवळे, लक्ष्मीकांत दाभाडकर, कृष्णा कदम, जिजा वाघ, कैलास कोळेकर, बाबू श्रीरामे , सुनील लोणकर, पंढरीनाथ सारके, मनीष पाटील, अशोक खेडकर, एकनाथ शिंदे, रेखा गतखने, डॉ. राज रणधीर, अतुल हेलसकर, शिवकुमार बैजल, गणेश खरात, भीमराव सपकाळ, शिवाजी तेलंग, दिनेश शेळके , दिव्या मिसाळ, राजाराम जाधव , डॉ. दिगंबर दाते, विना पाठक, राजेंद्र शेळके, या कवींच्या कविता सादर होणार आहेत. सुत्रसंचालन प्रा.अशोक खेडेकर हे करतील.

गुरूवारी ( ता. २७) सकाळी ११.०० वा. उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली ग्रंथालय व स्पर्धा परीक्षा या विषयावर परिसंवादात ना. तहसीलदार दिलीप सोनवणे , डॉ.ज्योती धर्माधिकारी, डॉ. शशिकांत पाटील, प्रा.मुकेश मदारी,श्याम शेलगांवकर, आणासाहेब खंदारे, यांचा सहभाग राहणार आहे. प्रा. कृष्णा कदम हे सुत्रसंचालन करतील.

दुपारी ०२.०० वा. रेखा बैजल यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथन सत्रात शरद सदाफुले , डॉ. प्रभाकर शेळके, प्रा.बसवराज कोरे यांचे कथाकथन होईल. सुत्रसंचालन सुरेश मेहेत्रे हे करतील.

दुपारी ०४.०० वा. जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सूर्यवंशी, जिल्हा माहिती अधिकारी अरुण सूर्यवंशी, जिल्हा कोषागार अधिकारी पंजाब


पुंडगे, साहित्यिक डॉ. रावसाहेब ढवळे, शिक्षणाधिकारी मंगल धुपे, राजेश राऊत, डि. बी. देशपांडे, अरूण प्रधान यांच्या उपस्थितीत ग्रंथोत्सवाचा समारोप होणार असून सूत्रसंचालन प्रा. राजकुमार बुलबुले हे करतील. साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने ग्रंथोत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन ग्रंथोत्सव समन्वय समितीचे अध्यक्ष ,सहाय्यक संचालक सुनील हुसे,सचिव जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे, सदस्य शिक्षणाधिकारी मंगल धुपे, अरुण सूर्यवंशी,डॉ.संजीवनी तडेगावकर, डि. बी. देशपांडे, राजेश राऊत, सतीश जाधव , शंकर पवार, राजेंद्र पगारे यांच्यासह जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांसाठी जलसंधारण योजना राज्यात प्रभावीपणे राबविणार - संजय राठोड

### मान्यवरांची ऑनलाईन उपस्थिती; गाळमुक्त धरण पोर्टलचे उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** जलस्त्रोतांची मर्यादा, पाणी टंचाई यामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पाणी असेल तरच शेतीची उन्नती होते. म्हणून पाणी आडवणे-साठवणे, तलावांचे पुनरुज्जीवन करणे काळाची गरज बनली. त्यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण या योजना सर्व गावात प्रभावीपणे कायम स्वरूपी राबविण्याच्या निर्णय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात शासनाने घेतला आहे, असे प्रतिपादन राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले.

या योजनांच्या प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी सुरू करण्यात आलेल्या गाळमुक्त धरण अर्थात हीींि:ीिींि:/ /ु.िहलुरी.ले/ पोर्टलचे उद्घाटन श्री. संजय राठोड यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील, भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतिलाल मुथ्था, राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला, एमडी कोमल जैन, राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, मृद व जलसंधारण अधिकारी तसेच सरपंच, ग्राम सेवक उपस्थित होते.



राठोड पुढे म्हणाले, शासनाच्या खांद्याला खांदा लावून अनेक स्वयंसेवी संस्था जलसांधरणाची कामे करीत आहेत. शांतिलाल मुथ्था यांच्या नेतृत्वात बीजेसने या उपयुक्त पोर्टलची निर्मिती करून जलसंधारण विभागास सुपूर्द केले. या योजनेचा उद्देश, पात्रता, निकष, प्रशिक्षण अशी संपूर्ण माहिती एका क्लिकर पोर्टलच्या माध्यमातून सर्वांना उपलब्ध झाली आहे. याचे उद्घाटन करताना मला अतिशय आनंद झाला.

राज्यातील सर्व सरपंचांनी, शेतकऱ्यांनी, गावकऱ्यांनी या महत्त्वपूर्ण पोर्टलचा लाभ घेऊन आपल्या गावात ह्या योजना मोठ्या प्रमाणावर राबविण्यासाठी पुढाकार घ्यावा. यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांचे मोठे सहकार्य लागणार आहे. निधीची कुठेही कमतरता पडणार असून थेट जिल्हाधिकाऱ्यांकडेच तो वर्ग करण्यात येईल, असेही राठोड यानी सांगितले.

गणेश पाटील यांनी या योजनेची भूमिका, महत्त्व स्पष्ट केले. शांतिलाल मुथ्था यांनी या पोर्टलची निर्मिती, उपयुक्तता, शेतकरी-सरपंचांसाठी असलेले महत्व थेट सांगितले. ऑनलाईन उदघाटन प्रसंगी सर्व जिल्हा अधीकारी, जालना जिल्हा अधिकारी, डॉ श्री कृष्णा पांचाळ, वॉटर प्रोग्राम हेड भारतीय जैन संघटना श्रीमती सपना सिंग, उपजिल्हा अधिकारी मनीषा दांडगे, राष्ट्रीय सचिव दीपक चोपडा, राष्ट्रीय कार्यकारिणीचे आदेश चंगेडिया, राज्य अध्यक्ष केतन शाह, राज्य सचिव, प्रवीण पारख, विभागीय अध्यक्ष धनराज सोळंकी, उपाध्यक्ष जालना जिल्हा अध्यक्ष विजय जैन श्रीश्रीमाळ, घनसावंगी तालुका प्रमुख नरेंद्र जोगड,कांतीलाल शेठीया, श्रीपाल मारलेचा, जिल्हा समन्वयक संदीप गवळी आदींची ऑनलाईन उपस्थिती होती. नंदकिशोर साखला यांनी उपस्थितांचे आभार मानले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# आरएनआय कडून ९९ हजार वृत्तपत्रांवर बंदी!

## स्थानिक पत्रकारांचा आवाज बंद करण्याचा हा प्रयत्न - संदीप काळे

**नवी दिल्ली** - रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर इंडिया (RNI) कार्यालयाने देशभरातील ९९,१७३ नोंदणीकृत स्थानिक वृत्तपत्रे आणि नियतकालिकांना 'DEFUNCT' (निष्क्रिय) यादीत टाकले असून या निर्णयाने संपूर्ण माध्यम क्षेत्रात खळबळ उडाली आहे. ही कारवाई त्या वृत्तपत्रांवर करण्यात आली आहे, ज्यांनी गेल्या पाच वर्षांत वार्षिक विवरणपत्र (Annual Statement) ऑनलाईन स्वरूपात सादर केलेले नाही. या निर्णयामुळे लघु, ग्रामीण व स्थानिक पातळीवर कार्यरत असलेल्या माध्यम संस्थांना मोठा फटका बसला आहे. अनेक संपादक, पत्रकार, मुद्रक आणि प्रकाशक संकटात सापडले असून, त्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया' पत्रकार संघटनांनी या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत, त्यामागे स्थानिक पत्रकारांचा आवाज बंद करण्याचा हेतू असल्याचा आरोप केला आहे.

या पार्श्वभूमीवर, 'व्हॉईस ऑफ मीडिया' या देशव्यापी पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून आपला निषेध नोंदवला आहे. पत्रात त्यांनी म्हटले आहे की, हा निर्णय म्हणजे स्थानिक पत्रकारांचा आवाज गप्प



करण्याचा प्रयत्न आहे. प्रशासनातील त्रुटी, भ्रष्टाचार, आणि जनतेच्या समस्या मांडणाऱ्या छोट्या माध्यम संस्थांवर अप्रत्यक्ष बंदी घालण्यात आली आहे.

संदीप काळे यांनी स्पष्ट सांगितले की, अनेक वृत्तपत्रांनी ठर्शांलिश्रळलरींळेप साठी अर्ज केले असूनही, प्रेस रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया (PRGI) कार्यालयाकडून त्यांना तांत्रिक कारणांवरून सातत्याने नकार दिला जात आहे. हा प्रकार थेट माध्यम स्वातंत्र्यावर गदा आणणारा असून, ही कारवाई तात्काळ मागे घेण्यात यावी, अशी त्यांनी मागणी केली आहे.

'व्हॉईस ऑफ मीडिया'ने यासंदर्भात देशभरात व्यापक आंदोलन छेडण्याची तयारी सुरू केली आहे. अनेक राज्यांतील पत्रकार संघटना आणि संपादक या आंदोलनात सहभागी होण्याच्या तयारीत असून, जर लवकरच ठछ्खने आपली भूमिका बदलली नाही, तर दिल्लीतील केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयासमोर शांततापूर्ण आंदोलन, निदर्शने किंवा धरणे आयोजित केली जाऊ शकतात, असा इशारा संघटनेने दिला आहे.

संदीप काळे म्हणाले, स्थानिक व लघु वृत्तपत्रे बंद झाली, तर लोकशाहीतील चौथा स्तंभ कमकुवत होईल. गावपातळीवर, तालुक्यात, जिल्ह्यात लोकांचे प्रश्न कोण मांडणार? म्हणूनच अशा प्रकारची थेट बंदी हे गंभीर संकट आहे.

# जेईएस महाविद्यालयात उद्योजकता विकास कार्यशाळा संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** येथील जेईएस महाविद्यालय जालनाच्या वाणिज्य विभाग आणि इंडो जर्मन टूल रूम छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने उद्योजकता विकास कार्यशाळा दिनांक २१ मार्च २०२५ शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आली होती.

यावेळी प्रमुख वक्ते फॉर्मल ट्रेनिंग स्कूल छत्रपती संभाजी नगरचे श्री मनोज ठाकरे व समंत्रक श्री राजेश चंचलानी संभाजीनगर हे दोघे होते. यावेळी बोलताना श्री मनोज ठाकरे म्हणाले की व्यापारी शिक्षण हे सर्व युवकांना योग्य संधी देते. त्यामुळे प्रत्येकाने इच्छा नुसार आपले क्षेत्र निवडले पाहिजे गव्हर्मेंट ऑफ इंडियाने बऱ्याच रोजगाराच्या संधी विविध क्षेत्रात उपलब्ध करून दिल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच श्री राजेश चंचलाणी यांनी उद्योजकता जागरूकता या विषयावर विद्यार्थ्यांना सविस्तर असे मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री होते, उपप्राचार्य डॉक्टर महावीर सदावर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गणेश कुलकर्णी यांनीकेले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. सूर्यकांत चौगुले यांनी केले उपस्थिताचे आभार डॉ. संकेत चौबे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ...

विनाअनुदानीत शिक्षकांना पडला आहे.शिक्षकांवर अर्थ खात्यांकडून वेळोवेळी अन्याय होत आहे.मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री सकारात्मक आहेत फक्त अर्थमंत्री म्हणून अजित दादा कडे शिक्षकांच्या नजरा लागलेल्या आहेत.येत्या दोन दिवसात अर्थमंत्री आजित दादांनी आमच्या मागण्यांचा विचार केला नाही तर आख्खि महाराष्ट्र पेटल्याशिवाय राहणार नाही आसा ईशारा यावेळी शिक्षकांनी दिला.

त्यामुळं जालना जिल्हाधिकारी कार्यालयावर विना अनुदानित शिक्षक संघाच्या वतीनं सामूहिक आत्मदहन मोर्चा काढण्यात आला. दरम्यान आमच्या मागण्या लवकर मंजूर केल्या नाही तर आणखी तीव्र आंदोलनाचा इशारा शिक्षकांनी दिला आहे. यावेळी जिल्हाभरातून शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

## आदिवासी आश्रम ...

पारंपारिक व्यवसाय किंवा ऊस तोडी सारख्या कामांना स्वीकारतात व उच्च शिक्षण घेण्याचे त्यांचे स्वप्न आपूर्ण राहते. म्हणून व्हीजेएनटी प्रवर्गातील मुला मुलींचे पुढील शिक्षण अधिक चांगल्या पद्धतीने होण्यासाठी ज्या शाळा प्राथमिक आहेत त्यांना नैसर्गिक वर्ग वाढीने माध्यमिक वर्ग जोडणे गरजेचे आहे, जेणेकरून सर्वांना शिक्षण या शासनाच्या भूमिकेप्रमाणे गोरगरिबांच्या मुलांना देखील न्याय मिळेल असेही आमदार लोणीकर यावेळी विधानसभेत म्हणाले.

जर या सर्व आश्रम शाळा प्राथमिक शाळांचे माध्यमिक व नंतर उच्च माध्यमिक शाळामध्ये रुपांतरीत झाल्या तर त्यांना उच्च दर्जाचे शिक्षण, रहाणे, जेवण व इतर सुविधा या गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत मिळतील व या आश्रम शाळांमध्ये जागतिक दर्जाचे शिक्षण घेणे सर्वांना सुलभ होईल, त्याच प्रमाणे या शाळांसाठी मिळणारे शासकीय अनुदान देखील अनेक दिवसांपासून रखडलेले आहे. सुरुवातीला प्रति विद्यार्थी १५०० रुपये अनुदान होते. मागील वर्षी च्या अनुदानात वाढ करून २२०० रुपये करण्यात आले. वाढ झालेली असली तरी मिळत असलेले अनुदान अत्यंत कमी प्रमाणात असून वाढत्या महागाईनुसार ते ३००० रुपये करण्यात यावे त्याचप्रमाणे या सर्व आश्रम शाळांमध्ये स्वतंत्र वाचनालय, भव्य क्रीडांगण इ. सोईसुविधांनी युक्त शैक्षणिक संकुल उभारले जावे यासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्यात यावा. अशी मागणी देखील आमदार लोणीकर यांनी विधानसभेत केली. तसेच प्रति विद्यार्थी १५०० रुपयावरून २२०० वाढ केल्याबद्दल आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री व तत्कालीन अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले

व्हीजेएनटी च्या आश्रम शाळांना नैसर्गिक वर्गवाढ तसेच रखडलेले १०० टक्के अनुदान मंजूर करण्याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा. आश्रम शाळांना गोरगरिबांच्या मुलांचे शिक्षण पूर्ण व्हावे या उद्देशाने नैसर्गिक वाढीनुसार ८ वी ते १० वी चे वर्ग १००% अनुदान तत्वावर जोडण्यात यावे. अनेक आश्रम शाळांचे नैसर्गिक वाढीनुसार ८ वीचे १० वी वर्ग वाढीचा प्रस्ताव सचिव व उपसचिव इतर मागास व बहुजन कल्याण मंत्रालय मुंबई यांच्याकडे प्रलंबित आहे. अनेक ठिकाणी अधिकारी स्तरावर आर्थिक देवाणघेवाण केल्याशिवाय आश्रम शाळांच्या फाईल पुढे जात नाहीत. आमदार बबनराव लोणीकर यांच्या या प्रश्नाला उत्तर देताना इतर मागास व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई केली जाईल असे स्पष्ट केले.

## अंजिठा लेणी ...

मार्गाचे काम प्रगती पथावर आहे. जालना ते जळगांव ( १७४ कि.मी.) या प्रकल्पासाठी अजिंठा लेणी जोडणीसाठी भुसंपादनाच्या प्रगतीबाबत श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी जालना जिल्हाधिकारी व अधिकाऱ्या सोबत, जिल्हाधिकारी कार्यालय,जालना येथे दिनांक २५ मार्च २०२५ रोजी जालना ते जळगांव या रेल्वे मार्गाच्या संदर्भात कामाचे स्वरुप व इतर बाबतीत भेट घेऊन स्वीस्तर चर्चा केली.

यावेळी जालना जिल्हाधिकारी, रेल्वे अधिकारी व भुमिलेख अधिकारी व इतर अधिकारी उपस्थित होते.







# सावंगी तलाव केंद्र राज्यस्तरावर शैक्षणिक व्हिडिओ बनवण्यात जिल्ह्यात अव्वल क्रमांक

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** राज्यस्तरावर शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेचे मूल्यांकन पूर्ण झाले असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरी ,केंद्र सावंगी तलाव, तालुका जालना येथील टेक्नोसेवी शिक्षक श्री प्रशांत लक्ष्मण भुरे यांनी तालुका स्तरावर चार गटात प्रथम क्रमांक तर जिल्हास्तरावर तीन गटात प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळविला आहे. श्री प्रशांत भुरे यांना शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धेत एकूण सात पुरस्कार मिळाल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी डॉक्टर भरत वानखेडे साहेब व सावंगी तलाव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री भागवत जेटेवाड सर आणि केंद्रातील सर्व शिक्षकांनी श्री प्रशांत लक्ष्मण भुरे यांचे अभिनंदन केले आहे.



यावेळी केंद्रीय मुख्याध्यापक प्रमोद पवार, नारायण मोहोरे, लक्ष्मण राठोड, किसन इरमले, राहुल डासाळकर, केशव तळेकर, गंगाधर होनवडजकर, रमेश रुद्रे, श्री बुंधे, गणेश जाधव, श्री हुसेन, अशोक जांभरूनकर, गणेश कोरधने, सत्यव्रत लोखंडे, राजू सदावर्ते, गोविंद मादीलवाड, प्रमोद साठेवाड, श्रीमती सीमंत मॅडम, श्रीमती नाडे मॅडम, श्रीमती चव्हाण मॅडम, श्रीमती पाटील मॅडम यांनी सरांना शुभेच्छा दिल्या.

# महादेव मंदिराचा भक्तांकडून जीर्णोद्धार

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील पुरातन काळातील जुने असलेले महादेव आणि बजरंग बली चे असलेले जवळपास ३५० वर्ष जुने असलेले मंदिर खूप जुने झाले होते. ही बाब येथील भक्त ज्येष्ठ नागरिक श्री सुभाष शिवाकिसन काबरा यांच्या लक्षात आली. त्यांनी त्यांच्या आई वडील स्व शिवकिसन आई स्व गीताबाई काबरा यांच्या स्मृती प्रित्यर्थ येथील सर्व मंदिराचे रंग रंगोटी करून मंदिर ची शोभा वाढविली. हे मंदिर येथील सर्वात जुन्या मंदिर पैकी एक असून महादेव मंदिराची भक्ती सध्या महिला मंडळ मध्ये खूप वाढली असून येथील सवर्च मंदिरात महिलांची गर्दी वाढलेली आहे. आधी खूप जुने दिसणारे मंदिर आता खूप चांगले दिसत असून भक्त मंडळी ने या मुळे आनंद व्यक्त केला आहे.



# प्रा. सिध्दार्थ पानवाले यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर

**परतूर । प्रतिनिधी -** सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल प्रा. सिद्धार्थ रामचंद्र पानवाले यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



भन्ते कश्यप ली यांनी या पुरस्काराची जालना येथे प्रसिध्दीपत्रक आणि निवडीच्या पत्राद्वारे जाहीर केले.

आंबेडकरी चळवळीसाठी आक्रमक वैचारिक भूमिका घेणे प्रसंगी रस्त्यावर येऊन मोर्चे आणि आंदोलन करणे कृतिशील चळवळ करणे यामुळे प्रा. सिद्धार्थ पानवले हे परिचित आहेत.

प्रा. सिद्धार्थ पानवले यांना मिळालेला हा चौथा पुरस्कार आहे.याअगोदर तेजस फॉउंडेशन नाशिकचा युवा समाजभूषण पुरस्कार,होल्डिंग हँड्स औरंगाबाद चा पुरस्कार, तसेच मुबई येथील सोशल रिसर्च फॉउंडेशन चा सम्राट अशोक राष्ट्रीय धम्म दूत पुरस्कार मिळालेला आहे. जालना येथे हा पुरस्कार येत्या ३० मार्च रोजी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार वितरीत केला जाणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्वांकडून अभिनंदन केले जात आहे.

### महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ
### जिल्ह्यात १ लाख ३० हजार ९७२ नोंदीत कामगार

# विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत २४ हजाराहून अधिक बांधकाम कामगारांना ७२ कोटी ४३ लाख रुपयांचे अर्थसहाय्य

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ जालना अंतर्गत इमारत बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येते. तसेच त्यांना जीवित बांधकाम कामगार म्हणुन ओळखले जाते. याबरोबरच त्यांना विविध कल्याणकारी योजनांचा देखील लाभ अदा करण्यात येत असतो. जालना जिल्ह्यात ९९ हजार १४६ कामगारांची नोंदणी व ३१ हजार ८२६ कामगारांचे नुतनीकरण करण्यात आले आहे. तरी जालना जिल्ह्यात आजपर्यंत १ लाख ३० हजार ९७२ कामगार नोंदीत कामगार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे जिल्हा उपकार्यकारी अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांनी दिली.



सरकारी कामगार अधिकारी हे कार्यालय जुन १९८१ पासून कार्यरत असून, या कार्यालयातंर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ हे सन २०१२ पासुन कार्यरत आहे. मंडळाचे कामकाज जुलै २०20 पासुन संपुर्ण संगणीकृत झाले असून, मंडळाद्वारे इमारत व बांधकाम क्षेत्रातील कामगारांची ऑनलाईन प्रणालीद्वारे नोंदणी करण्यात येते. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून विविध योजना राबविल्या जातात.

सन २०२४-२५ या कालावधीत विविध कल्याणकारी योजनेअंतर्गत २४ हजार, ४५४ बांधकाम कामगारांना ७२ कोटी ४३ लाख ३५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले. गृह उपयोगी साहित्य खरेदीसाठी ३ हजार रुपये अर्थसहाय्यासाठी १ हजार १४ नोंदीत लाभार्थी कामगारांना ३० लाख ४२ हजार रुपयांचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले. अवजारे खरेदीसाठी ५ हजार रुपये अर्थसहाय्य करण्यात येत असून १७ हजार ५९९ कामगारांना ८ कोटी ७९ लाख ९५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले आहे. या सर्व योजनेसाठी एकुण ४८ हजार ५५८ लाभार्थी कामगारांना ४७ कोटी ११ लाख ६३ हजार १५१ रुपये अर्थसहाय्यापोटी वाटप करण्यात आले आहेत. जानेवारी २०२४ पासुन बांधकाम कामगारांसाठी गृहपयोगी वस्तु संच ही योजना सुरु करण्यात आली असून, आजपर्यंत २१ हजार ५६९ इतक्या नोंदीत कामगारांना या योजनेचा लाभ मिळाला आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने जिल्ह्यातील प्रत्येक तालुकास्तरावर ‘तालुका कामगार सुविधा केंद्र’ १ सप्टेंबर, २०२४ पासून स्थापन केले असून, त्या ठिकाणी संबंधित तालुक्यातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभाचे अर्ज तपासणीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा उपकार्यकारी अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांनी दिली.

### किरकोळ वादात पिस्तुलचा वापर; एक जखमी
# मंठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील आर्डा टोलाजी पाटीवरील अहेरे पेट्रोलपंपावर २२ मार्च रोजी जुन्या वादाच्या राग मनात ठेवून एका इसम ावर भरदिवसा पिस्तूलच्या साहाय्याने जखमी करण्याची घटना मंठा तालुक्यातील मंठा लोणार रोड वरील आर्डा टोलाजी पाटीवरील आहेरे पेट्रोल पंप येथे घडली आहे.

सूत्रांकडून मिळालेली माहिती अनुसार दुपारी बारा वाजेच्या सुमारास मंठा ते लोणार रोड वरिल आहेरे पेट्रोलपंप येथे विकास बंडु चव्हाण वय २२ वर्ष रा ढोकसाळ हे पैशाची गरज असल्याने पेट्रोल पंम्पावर पैसे काढण्यासाठी गेले असता तेथे अविनाश लक्ष्मण चव्हाण व युवराज उघडे दोन्ही रा. पिंपरखेडा खराबे या दोन आरोपींनी विकास चव्हाण ला तिथे पाहताच म्हणाले

हा त्या दिवशीचा आपल्या सोबत ढोकसाळ शाळेसमोर भांडन करणारा आणी शिव्या देऊ लागेल..

असे पाहताच विकास चव्हाणने विचारले तुम्ही मला शिवीगाळ का करता ?

असे म्हणताच अविनाश चव्हाण याने पुन्हा शिवीगाळ करुन मला चापटा बुक्याने भरघोस माराहाण केली त्यावेळी अविनाश चव्हाण याच्या हातामध्ये बंदुक होती तीची मुठ विकासच्या डोक्यात मारुन त्याला जखमी केले आणि म्हणाले हा लय मस्तीला आला यास पकड असे युवराज यास म्हणाला असता युवराज याने त्याचे खीशातील फायटर काढुन पुन्हा विकासच्या डोक्यात मारुन दुखापत केली आणि म्हणाला तु जर परत आमच्या नादी लागला तर तुला व तुझ्या कुटुबालासहित जिवंत मारुन टाकण्याची धमकी विकास चव्हाणला दिली आहे.

याघटनेचा मंठा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कैलास भरती हे करत आहे.

